**नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पांतर्गत (१) ऑटोमोटीव्ह चौक ते मिहान व (२) प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर या उन्नत मेट्रो मार्ग प्रकल्पास मान्यता देण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## नगर विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक : नासुप्र-३३१३/प्र.क्र.४१/नवि-७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : 20 जानेवारी, २०१४.

संदर्भ : शासन निर्णय क्रमांक : एनआयटी-२२११/प्र.क्र.६४/नवि-७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ नोव्हेंबर, २०१२.

**प्रस्तावना :**

नागपूर महानगर प्रदेशातील वाढती लोकसंख्या आणि वाहनांची संख्या या अनुषंगाने निर्माण झालेली वाहतूक समस्या लक्षात घेता, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करणे गरजेचे झालेले आहे. नागपूर महानगर शहरातील वाहतूक समस्या निराकरणासाठी करावयाच्या विविध उपाययोजनांपैकी मेट्रो प्रकल्प राबविण्याकरिता नागपूर सुधार प्रन्यासने दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनची नेमणूक करुन त्यांच्याकडून सविस्तर प्रकल्प अहवाल अपेक्षिलेला होता.

दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन (डी.एम.आर.सी.) यांनी नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाकरीता तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये विविध छन्नमार्ग सुचविण्यात आलेले असून त्यामध्ये "मार्गिका क्रमांक- १: ऑटोमोटीव्ह चौक ते मिहान" व "मार्गिका क्रमांक- २: प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर " या उन्नत मेट्रो रेल्वे मार्गिकांचा समावेश आहे. या अहवालातील तांत्रिक बाबी, व्यवहार्यता आणि आर्थिक निकष यांचा साधकबाधक विचार करुन नागपूर सुधार प्रन्यासने ठराव क्रमांक १३/११२० दिनांक २३.०४.२०१३ अन्वये व नागपूर महानगर पालिकेने मुख्य सभा ठराव क्रमांक १७१, दिनांक ११.१०.२०१३ अन्वये सदर उन्नत मेट्रो रेल्वे प्रकल्पामध्ये त्यांच्या प्रत्येकी ५% आर्थिक सहभागास मान्यता दिली आहे.

शासनाच्या संदर्भाधीन निर्णयान्वये "नागपूर येथील सिताबर्डी विमानतळ बुटीबोरी या उन्नत मेट्रो रेल्वे मार्गिकेस तत्वत: मान्यता यापूर्वी देण्यात आली होती. तथापि, दिल्ली मेट्रो रेल कार्पोरेशन यांनी प्रस्ताविल्यानुसार नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पांतर्गत "मार्गिका क्रमांक- १: ऑटोमोटीव्ह चौक ते मिहान" व "मार्गिका क्रमांक- २: प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर " अशा दोन मार्गिकांच्या प्रकल्पास मान्यता देण्याचा प्रस्ताव नागपूर सुधार प्रन्यासकडून शासनाकडे प्राप्त झाला आहे. सदर नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पांतर्गत "मार्गिका

क्र-१ : ऑटोमोटीव्ह चौक ते मिहान (उत्तर-दक्षिण मार्गिका)", लांबी - १९.६५८ कि.मी. व "मार्गिका क्र-२ : प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर (पूर्व-पश्चिम मार्गिका)," लांबी १८.५५७ किमी अशा एकूण ३८.२१५ कि.मी. लांबीच्या दोन मेट्रो रेल्वे मार्गिकांचा स्मावेश आहे. सदर "मार्गिका क्र-१ : ऑटोमोटीव्ह चौक ते मिहान (उत्तर-दक्षिण मार्गिका)" या मार्गिकेकरिता सन २०१२ च्या दराने अपेक्षित भांडवली खर्च रु.३४३५ कोटी व "मार्गिका क्र-२ : प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर (पूर्व-पश्चिम मार्गिका)" या मार्गिकेकरिता सन २०१२ च्या दराने अपेक्षित भांडवली खर्च रु.३४२७ कोटी अस्रा एकूण रु. ६८६२ कोटी भांडवली खर्च अपेक्षित आहे. सदर दोन्ही मार्गिकांचा प्रकल्प पूर्णत्वासाठीचा अपेक्षित खर्च रु.८६८० कोटी आहे. वरील प्रमाणे प्रस्तावित नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पांतर्गत "मार्गिका क्रमांक- १: ऑटोमोटीव्ह चौक ते मिहान" व "मार्गिका क्रमांक- २: प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर " या उन्नत मेट्रो रेल्वे प्रकल्पास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या संदर्भात सर्वंकष विचारांती शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पांतर्गत "मार्गिका क्रमांक- १: ऑटोमोटीव्ह चौक ते मिहान" व "मार्गिका क्रमांक- २: प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर " या उन्नत मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या प्रस्तावास सोबतच्या परिशिष्ट-१ मधील तपशिलानुसार पुढील प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी "नागपूर मेट्रो रेल्वे कार्पोरेशन लिमिटेड" या नावाने एक स्पेशल पर्पज व्हेईकल (एस.पी.व्ही.) कंपनी स्थापन करण्यास सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-२** मध्ये नमूद केल्याप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

२. "नागपूर मेट्रो रेल्वे कॉपोरेशन लिमिटेड" या कंपनीस सदर प्रकल्प अंमलबजावणी संबंधातील अधिकार दिल्ली मेट्रो रेल कॉपोरेशन (डी.एम.आर.सी.) च्या धर्तीवर देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर स्पेशल पर्पज व्हेईकल कंपनी स्थापन होई पर्यन्त नागपूर सुधार प्रन्यासला सदर प्रकल्पासाठी कार्यान्वयीन संस्था म्हणून नियुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पामध्ये केंद्र शासनाचा २०% वित्तीय सहभाग, राज्य शासनाचा २०% वित्तीय सहभाग व नागपूर महानगरपालिका आणि नागपूर सुधार प्रन्यास यांचा प्रत्येकी ५% (असा दोघांचा एकूण १०%) वित्तीय सहभाग व उर्वरित ५०% कर्ज वा इतर स्त्रोताद्वारे निधी उभारणी या वित्तीय सहभागाच्या ढाचास मान्यता देण्यात येत आहे.

४. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी निधी उभारणी ढाच्यातील राज्यशासनाच्या २०% सहभाग हिस्सामध्ये शासकीय जमिनीची किंमत धरुन प्रकल्पासाठी आवश्यक असलेली शासकीय जमिन प्रचलित मुल्यांवर "नागपूर मेट्रो रेल्वे कॉपोरेशन लिमिटेड" या एस.पी.व्ही. (SPV) कंपनीकडे वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पांतर्गत एकूण आर्थिक खर्चातील नागपूर महानगरपालिका व नागपूर सुधार प्रन्यास यांच्या प्रत्येकी ५% हिश्याची रक्कम "नागपूर मेट्रो रेल्वे कॉपोरेशन लिमिटेड" या एस.पी.व्ही. कडे वर्ग करावी असे नागपूर सुधार प्रन्यास आणि नागपूर महानगरपालिका यांना निर्देश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६. सदर प्रकल्पाचे वित्तीय स्त्रोतांच्या नियोजनाबाबतच्या सोबतच्या **परिशिष्ट-३** नमूद केलेल्या स्त्रोतांना मान्यता देण्यात येत आहे आणि सदर स्त्रोतातून नागपूर सुधार प्रन्यास व नागपूर महानगरपालिका यांना प्राप्त होणारा निधी त्यांनी त्यांच्या स्तरावर एका वेगळया "नागरी वाहतूक निधी" मध्ये ठेवून त्याचा विनियोग सदर प्रकल्पासाठी करावयाच्या अर्थसहाय्याचे प्रदान करण्यासाठी तसेच प्रकल्पाच्या कर्जाची परतफेड करण्यासाठी सदर प्रकल्पाकरिता स्थापन केलेल्या एसपीव्ही कंपनीकडे वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प केंद्रीय मेट्रो अधिनियमाच्या तरतूदीखाली राबविण्यात येणार असल्याने सदर मेट्रो रेल्वे सेवेसाठी सोबतच्या **परिशिष्ट-४** मध्ये नमूद केल्यानुसार प्रवासो भाडे दरास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे. सदर भाडयामध्ये ठरावीक कालावधी नंतर आवश्यकते प्रमाणे सुधारणा करण्याचे अधिकार केंद्रीय मेट्रो अधिनियमाच्या तरतूदीनुसार स्थापन करावयाच्या भाडे निश्चिती समितीकडे ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

८. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या वर उल्लेखित दोन्ही मार्गिकांचे एकत्रित प्रस्ताव केंद्र शासनाकडे मंजूरीस्तव सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

९. नागपूर शहरात मेट्रो रेल्वे प्रकल्प राबविण्यासाठी "The Metro Railways (Construction of works) Act, १९७८ " लागू करण्यासाठी केंद्र शासनाकडे महाराष्ट्र शासनाने विनंती करण्यास व या संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या वतीने नागपूर सुधार प्रन्यासद्वारे केंद्रशासनाकडे पाठपुरावा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१०. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्प राबविण्यासाठी केंद्र शासन व रेल्वे प्रशासनाशी आवश्यक तो पत्र व्यवहार करण्यास व केंद्र शासनाकडून त्यांच्या सहभाग हिश्याची २०% निधी मिळविण्यासाठी नागपूर सुधार प्रन्यास/ सदर एसपीव्ही कंपनीला प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

११. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीकोनातून आवश्यक निर्णय घेण्यासाठी, सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-५ मध्ये** नमूद केल्याप्रमाणे, उच्चाधिकार समिती (High Power Committee) गठित करण्यांस व सदर उच्चाधिकार समितीच्या कार्यकक्षेस मान्यता देण्यात येत आहे.

१२. सदर प्रकल्पास निकडीचा सार्वजनिक प्रकल्प व महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

हा शासन निर्णय नियोजन विभाग अनौपचारीक संदर्भ क्र.२(५)१४४४ दिनांक ६.०१.२०१४ व वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्र.४/२०१४/व्यय-३, दिनांक ८.०१.२०१४ अन्वये प्राप्त अभिप्रायांचा विचार करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

३०.१.२०१४

(एस. के. सालीमठ)
उपसचिव, महाराष्ट्र राज्य

प्रति,

मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव.
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
मा. राज्यमंत्री (नवि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्राल्य, मुंबई ४०० ०३२.
प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
सचिव (विशेष प्रकल्प), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ कंपनी.
विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
पोलिस आयुक्त, नागपूर.
सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर
आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
जिल्हाधिकारी, नागपूर.
महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई.
विभागीय रेल्वे प्रबंधक, मध्य रेल्वे, नागपूर.
विभागीय रेल्वे प्रबंधक, दक्षिण-पूर्व मध्य रेल्वे, नागपूर.
महाव्यवस्थापक, नागपूर महानगर परिवहन महामंडळ मर्यादित, पुणे.
सह सचिव, नगर रचना, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
संचालक, नगर रचना, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे.
उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
कार्यासन अधिकारी (नवि-२६), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती (नवि-७).

## परिशिष्ट-१

## नागपूर मेट्रो रेल्वे प्रकपांर्गत मेट्रो रेल्वे मार्गिकांचा तपशील

| विवरण | स्थानके | जमिनीच्या वर (उन्नत) लांबी (कि.मी.) | जमिन पातळीवर लांबी (कि.मी.) | एकूण लांबी (कि.मी) |
|---|---|---|---|---|
| मार्गिका क्र-१: ऑटोमोटीव्ह चौक ते मिहान (उत्तर-दक्षिण मार्गिका) | जमिन पातळीला - २ व जमिनीच्या वर-१५ | १५.०५८ | ४.६० | १९.६५८ |
| मार्गिका क्र-२: प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर (पूर्व-पश्चिम मार्गिका ) | जमिनीच्या वर-१९ | १८.५५७ | ००० | १८.५५७ |
| | | ३३.६१५ | ४.६० | ३८.२१५ |

----

## परिशिष्ट- २

**नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी स्थापन करावयाच्या स्पेशल परपज व्हेहीकल (एस.पी.व्ही.) ची संरचना :**

नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर महानगरपालिका, राज्य शासन व केंद्र शासन यांचा आर्थिक सहभाग असलेली "नागपूर मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड" या नावाने स्थापन करावयाच्या स्पेशल परपज व्हेहीकल कंपनीचे संचालक म्हणून खालील प्रतिनिधींचा समावेश राहील.:-

१. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन,
२. प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, महाराष्ट्र शासन
३. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन
४. सभापती, नागपूर सुधार प्रन्यास
५. महापालिका आयुक्त, नागपूर महानगरपालिका
६. व्यवस्थापकिय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी
७. केंद्र शासनाचे नामनिर्देशित अधिकारी- ५

वर प्रस्तावित संचालक हे नियोजित एस.पी.व्ही कंपनीसाठी भागधारक असतील. सदर प्रस्तावास मान्यता देतांना केंद्र शासन ज्या संचालकांचा अंतर्भाव या एस.पी.व्ही. कंपनीमध्ये समाविष्ठ करण्याचा आदेश देईल, त्यांचा समावेश करण्यात येईल.

------

# परिशिष्ट- ३

**[I] नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी निधी उभारण्यासाठी निश्चित करण्यात आलेले आर्थिकस्त्रोत -**

(i) मेट्रो मार्गिकाच्या दोन्ही बाजूस ५०० मी. अंतरापर्यंत येणा-या जमीनीवर अधिमुल्य आकारुन ४ चटईक्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेत अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक (एफ.एस.आय.) देण्याची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीत करुन त्यानुसार अधिमुल्याची रक्कम संबंधीत नियोजन प्राधिकरणाने वसूल करणे व त्यापैकी ५०% रक्कम पायाभूत सुविधांच्या सुधारणांसाठी स्वत:कडे ठेवून घेऊन उर्वरित ५०% रक्कम सदर प्रकल्पासाठी नियुक्त एसपीव्ही यांस देणे.

(ii) शासन अधिसूचित करेल असे महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प राबविण्यात येणाऱ्या शहरात महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतूदीनुसार आकारण्यात येणारे विकास शुल्क १००% पर्यत वाढ करून आकारण्याविषयी कायद्यात तरतूद करणे व त्यानुसार वसूल होणारी वाढीव रक्कम अशा प्रकल्पासाठी वापरणे.

(iii) शासन अधिसूचित करेल असे महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प राबविण्यात येणाऱ्या महानगरपालिका क्षेत्रात मुंबई मुंद्राक अधिनियम, १९५८ अन्वये स्थावर मालमत्तेचे अनुक्रमे विक्री, देणगी व फलोपभोग गहाण यावरील संलेखावर बसवायच्या मुद्रांक शुल्कासोबतच जमीनी व इतर स्थावर मालमत्तेचे विक्री किंवा देणगीच्या बाबतीत अशा रितीने स्थित असलेल्या मालमत्तेच्या मुल्यांवर व फलोपभोग गहाणाच्या संलेखाच्या बाबतीत संलेखात मांडण्यात आलेल्या संलेखाद्वारे सुरक्षित रक्कमेवर १% अधिभार लावण्याची तरतूद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात करुन अशा प्रत्यक्ष जमीनी व इतर स्थावर मालमत्तेचे अनुक्रमे विक्री, देणगी व फलोपभोग गहाण संलेखाच्या नोंदणीच्या वेळी सदर अधिभाराची रक्कम संबंधित जिल्हा उपनिबंधकांनी वसूल करणे व शासनाने यामाध्यमातून वसूल झालेल्या रक्कमेएवढे अनुदान संबंधित महानगरपालिका किंवा संबंधित महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्पासाठी नियुक्त एसपीव्ही यांस देणे.

(iv) मेट्रो रेल्वे स्टेशन व कार डेपोंच्या जागेचे व्यावसायिक वापरास परवानगी देणे व त्यानुसार विकसनाद्वारे प्राप्त होणारे उत्पन्न प्रस्तुत प्रकल्पासाठी वापरणे.

(v) मेट्रो रेल्वे स्टेशन येथील जाहिरात व पार्कीगपासून मिळणारे उत्पन्न सदर प्रकल्पासाठी वापरणे.

**[II]** सदर स्त्रोतांतून संबंधित नियोजन प्राधिकरणांना प्राप्त होणारा निधी त्यांनी त्यांच्यास्तरावर एका वेगळया "नागरी वाहतूक निधी" मध्ये ठेवून त्याचा विनियोग सदर प्रकल्पासाठी करावयाच्या अर्थसहाय्याचे प्रदान करण्यासाठी तसेच प्रकल्पाच्या कर्जाची परतफेड करण्यासाठी वर उल्लेखिलेल्या एसपीव्ही कंपनीकडे नियमितपणे वर्ग करण्यासाठी करावयाचा आहे. सदर कर्ज परतफेडीसाठी नागरी वाहतूक निधी कमी पडल्यास नागपूर महानगरपालिका व नागपूर सुधार प्रन्यासच्या इतर स्त्रोतातून त्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावयाचा आहे.

---

## परिशिष्ट- ४

**नागपूर मेट्रो रेल्वेकरिता विहीत प्रवासी भाडे :-**

नागपूर मेट्रो रेल्वेसाठी सन २०१८-१९ चा भाडे तक्ता खालीलप्रमाणे राहील:-

| अ.क्र. | अंतर (कि.मी.) | भाडे (रुपयात) |
|---|---|---|
| १. | ०-२ | १५ |
| २. | २-४ | १९ |
| ३. | ४-६ | २३ |
| ४. | ६-९ | २८ |
| ५. | ९-१२ | ३० |
| ६. | १२-१५ | ३४ |
| ७. | १५-१८ | ३६ |
| ८. | १८-२१ | ३९ |
| ९. | २१ पेक्षा जास्त | ४१ |

---

## परिशिष्ट-५

**नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाठी उच्चाधिकार समितीची रचना व कार्यकक्षा**

नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीकोनातून आवश्यक निर्णय घेण्यासाठी शासनातर्फे गठित उच्चाधिकार समिती (High Power Committee)ची रचना पुढीलप्रमाणे राहील:-

| **क्रमांक** | **उच्चाधिकार समितीचे सदस्य** | |
|---|---|---|
| १ | मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई- ३२ | अध्यक्ष |
| २ | अप्पर मुख्य सचिव, महसुल विभाग, मंत्रालय मुंबई - ३२ | सदस्य |
| ३ | अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय मुंबई - ३२ | सदस्य |
| ४ | अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय मुंबई - ३२ | सदस्य |
| ५ | अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई - ३२ | सदस्य |
| ६ | प्रधान सचिव नगर विकास विभाग (१), मंत्रालय मुंबई - ३२ | सदस्य |
| ७ | प्रधान सचिव, नगर विकास -(२) मंत्रालय मुंबई - ३२ | सदस्य |
| ८ | विभागीय आयुक्त, नागपूर | सदस्य |
| ९ | आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर | सदस्य |

| क्रमांक | उच्चाधिकार समितीचे सदस्य | |
|---|---|---|
| १० | पोलिस आयुक्त, नागपूर | सदस्य |
| ११ | व्यवस्थापकिय संचालक,महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी | सदस्य |
| १२ | जिल्हाधिकारी, नागपूर | सदस्य |
| १३ | विभागीय रेल्वे प्रबंधक, मध्य रेल्वे, नागपूर | सदस्य |
| १४ | विभागीय रेल्वे प्रबंधक, दक्षिण-पूर्व मध्य रेल्वे, नागपूर | सदस्य |
| १५ | सभापती, नागपूर सुधार प्रन्यास,नागपूर | सदस्य सचिव |

नागपूर महानगर प्रदेशात मेट्रो रेल्वे या प्रकल्पांशी संबंधित सहकार्य अपेक्षित असलेल्या राज्यशासनाच्या कोणत्याही विभागाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास सदर उच्चाधिकार समितीच्या बैठकीसाठी आवश्यकतेप्रमाणे बोलविण्याचे अधिकार सदर समितीस राहतील.

नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या उच्चाधिकार समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहील :-

i. नागपूर मेट्रो रेल्वे उभारणे व परिचलन करणे या संबंधातील धोरणात्मक बाबींवर निर्णय घेणे.
ii. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पासंदर्भात जमीन वापर बदल, वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक व तद्नुषंगिक सवलती देण्यासंदर्भात निर्णय घेण्याकामी शासनास उचित शिफारसी करणे.
iii. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पास राज्य शासनाचा देय हिस्सा वितरित करण्यासाठी निर्देश देणे.
iv. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या विस्तृत प्रकल्प अहवालात नमूद केल्याप्रमाणे अथवा आवश्यकतेप्रमाणे इतर आर्थिक पर्यायांच्या अंमलबजावणीसाठी शासनास शिफारसी करणे सदर प्रकल्पासाठी कालबध्द कार्यक्रम ठरवून त्यांच्या अमंलबजावणीचे सनियंत्रण करणे.
v. केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पामध्ये आवश्यक त्या सुधारणा/बदल करुन अंमलबजावणीस मान्यता देणे.
vi. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी आवश्यक तसेच सदर प्रकल्पासाठी उभारण्यात येणाऱ्या स्पेशल पर्पज व्हेईकल कंपनीच्या अखत्यारित नसलेल्या बाबींवर निर्णय घेणे.

---